Exh. 5/D

रे.क.नं.22 /२०२६

# कागल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,

# यांचे कोर्टात...

| | | |
|---|---|---|
| १) **मारूती तुकाराम पाटील,**<br>व.व. ६०, धंदा: शेती,<br>रा. केनवडे, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर | } | वादी |

**विरूध्द**

| | | |
|---|---|---|
| १) **शेवंता शिवाजी पाटील,**<br>व.व. ६८, धंदा: घरकाम,<br>रा. बिद्री, ता. कागल<br>जि. कोल्हापुर<br>२) **अश्विनी युवराज मगदुम,**<br>व.व.३३, धंदा: घरकाम,<br>रा. केनेवडे, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर | } | **प्रतिवादी** |

**<u>अर्ज :– सी. पी. सी. ऑ. ३९ रूल १ व २ सह कलम १५१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाईसाठी अर्ज.</u>**

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

AnyScanner

**यातील वादी यांचा विनंती अर्ज असा की,**

प्रस्तुत दावा यातील वादी यांनी हक्कज्ञापन व कायम मनाई हुकूम होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे सदरचा दावा गुणदोषावर चालून अंतिम निकाल होणेस बराच कालावधी होणार आहे दरम्यानच्या काळात प्रतिवादी नं. २ यांनी रजि. दस्त नं. ११४/२०२६ दि. १४/०१/२०२६ च्या अधारे दावा मिळकतीतील वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी नं. २ विरूध्द होणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

१) **दावा मिळकतीचे वर्णन:**

अ) मौजे केनवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील शेतजमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे—

१) गट नं. ३५४अ हे. ०.३४ आर आकर रू. ४.१८ पैसे. यापैकी हे. ०.२२.२७ आर आकार रू. २.७२ पैसे. यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे:—

| | | |
|---|---|---|
| पुर्व | : | बंडू संतु पाटील यांची मिळकत |
| पश्चिम | : | ओढा पात्र |
| दक्षिण | : | विजय ज्ञानु पाटील यांची मिळकत |
| उत्तर | : | विष्णु महादेव पाटील यांची मिळकत |

वरील मिळकत या दावेचा विषय असुन संक्षेपाकरीता सदर **दावा मिळकत** असे संबोधण्यात येत आहे.

२) वरील दावा मिळकत हया मुळच्या वादी व प्रतिवादी नं. १ व भारतीय आनंदा कोकणे, बाळासो तुकाराम पाटील व सखुबाई

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

AnyScanner

मालवेकर यांची वाड वडिलार्जीत एकत्र कुटुंबाजी मिळकत आहे अद्याप सदर मिळकत व अन्य मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. दावा मिळकती मध्ये सध्य स्थितीत वादी यांची कब्जे वहिवाट आहे. दावा मिळकती मध्ये वादी हे आपले शेत घर बांधुन राहत आहेत.

३) दावा मिळकत ही वादी प्रतिवादी व अन्य हिस्सेदार यांची वाड वडिलार्जीत मिळकत असून वादी व प्रतिवादी नं. १ याचे वडिल तुकाराम गोपाळा पाटील यांच्या नांवे नमुद होती. यातील तुकाराम हे अशिक्षित, वयस्कर व आजारी असलेचा गैरफायदा घेऊन रजि. दस्त क्र. २६९/२०१८ चा दस्त प्रतिवादी नं. १ यांनी आपल्या हक्कामध्ये नोंदविलेचे वादी यांना मे २०२३ रोजी समजुन आले. तथापि सदरचा दस्तास वादी यांची कोणतीही संमती घेतलेली नव्हती व नाही. सदरच्या दस्ताच्या अधारे प्रतिवादी नं. १ हया दावा मिळकत विक्री करणार आहेत असे समजलेने वादी यांनी प्रतिवादी नं. १ हया सदरचा दस्ताच्या आधारे ७/१२ पत्रकी नाव लावलेचा गैरफायदा घेऊन सदरची मिळकती बाबत कोणताही व्यवहार करू नये म्हणुन दैनिक पुढारी कोल्हापुर आवृती मध्ये दि. ०५/०५/२०२३ इ. रोजी जाहिर नोटीस ही प्रसिध्द केलेली होती. अशी परिस्थिती असताना व दावा मिळकती मध्ये प्रतिवादी नं. १ यांची कब्जे वहिवाट नसताना प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांच्या हक्का मध्ये रजि. दस्त क्र. ११४/२०२६ दि. १४/०१/२०२६ चा विना कब्जेचा दस्त नोंदविला. मुळातच दावा मिळकती मध्ये वादी यांचे घर असुन उर्वरित क्षेत्रामध्ये वादी यांनी सोयाबिन व भात पिके घेत आहेत.

४) वरीलप्रमाणे परिस्थिती असताना दि. ०१/०२/२०२६ इ. रोजी सकाळी ९ वाजता वादी हे कष्ठमशागत करीत असताना यातील प्रतिवादी नं.२ या दावा मिळकती जवळ येऊन वादींना म्हणाल्या की

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

AnyScanner

येथूनपुढे या जमीनीत यायचे नाही तसेच तुम्हा बांधलेले घर काढुन घ्या मि शेतजमिन विकत घेतली आहे असे म्हणून वादींचे असले शांततामये कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केले असे म्हटलेने वादीस धक्काच बसला. त्यानंतर वादींनी चौकशी केली असता प्रतिवादी वादी नं. १ नी प्रतिवादी नं. २ व्यवहार केलेचे वादीच्या निदर्शनास आले. मुळातच वादीच्या वडिलांना प्रतिवादी नं. १ यांच्या हक्कामध्ये खरेदीपत्र करून देणेचा कोणताही अधिकार नव्हता. त्याचप्रमाणे त्यांना सदरची मिळकत विकेणेची कोणतेही गरज नव्हती. सदरचा दस्त हा वादीचा भाऊ बाळासो व प्रतिवादी नं. १ यांनी वादीचे वडिल तुकाराम हे अशिक्षित, वयस्कर व आजारी असलेचा गैरफायदा घेऊन संगणमताने केलेला आहे. त्यास वादी यांची कोणतेही सहमती घेतलेली नव्हती व नाही. त्यामुळे सदर दस्ताच्या आधारे प्रतिवादी यांना कोणतेही अधिकार प्राप्त होत नव्हते व नाहीत. त्यामुळे सदरचा दस्त हा वादीच्या हक्कावर बंधन कारक नव्हता व नाही. त्याचप्रमाणे यातील प्रतिवादी नं. १ यांना सदरच्या दस्ताच्या आधारे कोणतेही मालकी प्राप्त झालेली नसताना त्यांनी ७/१२ पत्रकी आपले नाव लागलेचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नं. २ च्या हक्कामध्ये बोगस विना कब्जेचा रजि. दस्त क्र. ११४/२०२६ चा दस्त नोंदविला. मुळातच प्रतिवादी नं. १ यांना दावा मिळकती बाबत कोणतेही हक्क प्राप्त झालेले नसलेमुळे प्रतिवादी नं. २ यांना कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत.

५). दावा मिळकत ही वाडवडिलार्जीत मिळकती असून वादीच्या वडिलांना वादी यांचे हक्क डावलून प्रतिवादी नं. १ यांच्या हक्कामध्ये विकण्याचा कोणताही अधिकार नव्हता व नाही. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या वाटण्याही झालेल्या नसताना वादीच्या संमंतीशिवाय वादीच्या वडिलांना यास कायदयातील असल्या

Asstt. Supdt.

तरतुदींप्रमाणे विकण्याचा कोणताही अधिकार नव्हता व नाही. त्यामुळे दावा मिळकती संदर्भात रजि. दस्त नं. २६९/२०१८ ने दि. १६/०२/२०१८ व रजि. दस्त नं. ११४/२०२६ दि. १४/०१/२०२६ इ. रोजीची खरेदीपत्र वादींच्या दावा मिळकतीत असलेल्या सामाईक हिस्यावरती बंधनकारक नाहीत. प्रतिवादी नं. २ हया त्रयस्थ आहेत त्यांचा वाडवडीलार्जीत मिळकतीशी काहीही संबंध नाही.

६) यातील प्रतिवादी नं. २ यांनी खरेदीपत्राच्या आधारे वादींच्या दावा मिळकतीत असल्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

७) **दावेस कारणः—**

दि. ०१/०२/२०२६ इ. रोजी सकाळी ९ वाजता वादी हे कष्ठमशागत करीत असताना यातील प्रतिवादी नं.२ या दावा मिळकती जवळ येऊन वादींना म्हणाल्या की येथूनपुढे या जमीनीत यायचे नाही तसेच तुम्हा बांधलेले घर काढुन घ्या मि शेतजमिन विकत घेतली आहे असे म्हणून वादींचे असले शांततामये कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केले त्यावेळी वादींच्या असले शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी दाव्यास कारणे घडले आहे.

८) सदर कामी तुर्तातुर्त मनाई हुकूम झालेस प्रतिवादी नं. २ यांचे कोणतेही अगर कसलेही नुकसान होणार नाही तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर झालेस वादीचे कशानेही न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे.

९) न्यायाचा तराजू वादीचे बाजूने असून अंतीम यशाची खात्री वादीस आहे.

१०) प्रथमदर्शनी केस ही प्रतिवादीचे बाजूने नसून वादीचे बाजूने आहे.

११) **सबब मे. कोर्टांना नम्र विनंती की,**

अ) वादी यांचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) यातील प्रतिवादी नं. २ यांनी खरेदीपत्राचे आधारे वादींच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम व्हावा.

क) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) न्यायाचे इतर अन्य हुकूम वादी यांचे बाजूने व्हावेत.

..... येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल

ता. ११/०२/२०२६.

**प्रतिज्ञा**

मी यातील वादी कथन करतो की, वरील अर्जामधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्कामी कागल
दि. ११/०२/२०२६.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

AnyScanner

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी मारूती तुकाराम पाटील व.व. ६०, धंदा: शेती, रा. केनवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, प्रतिज्ञेमधील संपुर्ण मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुक्कामी कागल.

दि. ११/०२/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना
ओळखतो

**ॲड. जी. व्ही. चौगले**

ॲफिडेव्हीट करणार

## प्रतिज्ञा

मी यातील वादी मारूती तुकाराम पाटील सत्य प्रतिज्ञेवर करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्कामी कागल.

दि. ११/०२/२०२६.

Solemnly Affirmed before me by
Shri. Maruti Tukaram Patil
Age 60 of Kenvade Kagal who is
identified by Shri G.V. Chougule Adv
............whom I know personally
Dated :- 11/2/26

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.18 17:56:19 +0530

AnyScanner